**प्रेसनोट** दि. 08/09/2026

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | **पुणे घटक** |
| 2 | तक्रारदार | पुरुष, वय 35 वर्षे |
| 3 | आरोपी | श्री महेश अंकुश उगले, वय 36 वर्ष, पद - पोलीस हवालदार ब. नं. 2637, नेमणूक बारामती ग्रामीण पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, **वर्ग (3)** रा. - फ्लॅट नं. 4 विमलनाथ अपार्टमेंट, सुतारचाळ, विजयनगर, बारामती, ता. बारामती, जि.पुणे |
| 4 | तक्रार | **तक्रार**- यातील तक्रारदार यांनी दिनांक 07/09/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली की, तक्रारदार यांची पत्नी ह्या झुंबा डान्स क्लास व जिम चालवतात. सदर झुम्बा डान्स क्लासमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सदर झुम्बा डान्स क्लास व त्या अनुषंगाने तक्रारदार व त्यांची पत्नी यांच्यावर कारवाई व्हावी या मजकुराचा तक्रारी अर्ज लोकसेवक श्री महेश अंकुश उगले पोहवा 2637 बारामती तालुका पोलीस स्टेशन यांच्याकडे चौकशीसाठी प्राप्त झाला असता सदर अर्जात तक्रारदार व त्यांची पत्नी यांच्यावर कारवाई न करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून 7,00,000/- रुपयांची लाचेची मागणी करून कारवाईची भीती घालून त्यापैकी 2,00,000/- रुपये यापुर्वी स्वीकारले आहेत व उर्वरित 5,00,000/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे अशी तक्रार, तक्रारदार यांनी दिली आहे. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 07/09/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक पोहवा 2637 महेश उगले, नेमणूक बारामती तालुका पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार यांच्या विरुध्द दाखल असलेल्या अर्जात तक्रारदार व त्यांची पत्नी यांच्यावर कारवाई न करण्यासाठी पंचासमक्ष 7,00,000/- रुपये लाचेबद्दल बोलणे करून यापूर्वी 2,00,000/- रुपये स्वीकारल्याचे मान्य करून उर्वरित 5,00,000/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती दर्शविल्याचे निष्पन्न झाले आहे. |
| 6 | सापळा कार्यवाही | वरील प्रमाणे लाच मागणी झाल्यानंतर दिनांक 08/09/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक श्री महेश उगले पोहवा 2637 यांनी तक्रारदाराकडून पी.डी.सी.सी. बँकेजवळ, माळेगाव रोड, बारामती येथे लाचेची रक्कम रुपये 5,00,000/- पंचासमक्ष स्वीकारली असता 15.02 वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| 7 | गुन्हा रजिस्टर नं./ कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा,दिनांक व वेळ | बारामती शहर पोलीस ठाणे पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक,वेळ | आरोपी लोकसेवक पोहवा 2637 महेश उगले, नेमणूक बारामती तालुका पोलीस स्टेशन यांना 15.02 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. |
| 9 | सापळा अधिकारी | श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8806321817 |
| 10 | पर्यवेक्षण अधिकारी | श्री. सतिश वाळके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020 |
| 11 | सापळा पथक | 1) पो. हवा. प्रवीण तावरे, 2) पो. कॉ. आश्विन कुमकर,<br>3) चा. पो. कॉ. चंद्रकांत कदम, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे. |
| 12 | मार्गदर्शन | 1)श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.पुणे, मो.नं. -9823167154<br>2)श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे,मो.नं. 9029030530 |

13 लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | **घटक कार्यालय** | **परिक्षेत्र कार्यालय** | **ला.प्र.वि, मुख्यालय** |
|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 |
| पत्ता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001 | पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 01 | ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030 |
| दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक | (020)26132802, व्हॉटस्ॲप क्र.9403781064, 1064 | (020) 26122134, 1064 | (022) 24921212 |
| ई- मेल आय.डी. | dyspacbpune@mahapolice.gov.in | spacbpune@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे